IMPACT FACTOR
5.473 (SJIF)

UPA NATIONAL E-JOURNAL
*Interdisciplinary Peer-Reviewed Indexed E-Journal*

ISSN
2455-4375

# जागतिक महामारीचा मानवी मनावर झालेला परिणाम

**प्रा. डॉ.कमलाकर पी. तागडे**
प्रमुख समाजशास्त्र विभाग
डॉ. म. वा. पी. डब्ल्यू. एस.
कला व वाणिज्य महाविद्यालय,
नागपूर
Email : kptagde123@gmail.com

---

**गोषवारा**

मानव आणि निसर्ग हे या जगातील वेगळे नाते. निसर्गाशिवाय संपूर्ण मानवी समाजाच अस्तित्वाची कल्पनाच करता येत नाही. त्यामुळे निसर्गाचे संवर्धन आणि जतन करणे हे मानवाचे प्रथम कर्तव्य आहे. मानवाने निसर्गावरती अविवेकी हल्ला केला, त्याने विकास प्रक्रियेला गती आणण्याकरिता चुकीच्या पध्दतीने विकास घडविण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे परिस्थितीकीय संतुलन बिघडल्यामुळे मानवाला त्याचे परिणाम आजपर्यंत भोगावे लागत आहेत. मोठमोठी धरणे, मोठमोठे कारखाने आणि जंगलाची कटाई व जमिनीला दळणवळणाकरिता फार मोठया प्रमाणात चिरफाड करणे इत्यादी मुळे नैसर्गिक वातावरण हे असंतुलीत झाली आहे. त्यामुळे मानवी समाजाला अनेक प्रकारच संकटांना समोर जातांना मानवाला आपले प्राण गमवावे लागत आहे. कोरोना विषाणुचा प्रभाव संपूर्ण जगावरती इतका पडला की, संपूर्ण मानवी जीवन क्षणार्धात नष्ट झाली. आज संपूर्ण विश्वामध्ये कोरोना या विषाणुने ज्या पध्दतीने मानवी जीवन संपविले त्या प्रमारे दुसऱ्या कोणत्याही रोगाने इतका ऱ्हास मानवी समाजावर झाल्याचे आढळुन येत नाही. परंतु इतिहासामध्ये या सारख्या फ्ल्यु, प्लेग इत्यादींनी मानवी आयुष्य उध्वस्त केले असल्याचे आढळते.

**प्रमुख शब्द** – औद्योगिकरण, जागतिक महामारी, लॉकडाऊन, वर्क फॉर्म होम

---

मानवी समाजाच्या अस्तित्वाची कल्पनाच करता येत नाही. त्यामुळे निसर्गाचे संवर्धन आविजतन करणे हे मानवाचे प्रमुख कर्तव्य आहे. मानवाने निसर्गावरती अविवेकी हल्ला केला. त्याने विकास प्रक्रियेला गती आणण्याकरिता चुकीच्या पध्दतीने विकास घडविण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे परिस्थितीकीय संतुलन बिघडल्यामुळे मानवाला त्याचे परिणाम आजपर्यंत भोगावे लागत आहेत. मोठमोठी धरणे, मोठमोठे कारखाणे आणि जंगलाची कटाई व जमिनीला दळणवळणाकरिता फार मोठया प्रमाणात चिरफाड करणे इत्यादीमुळे नैसर्गिक वातावरण हे असंतुलीत झाले आहे. त्यामुळे मानवी समाजाला अनेक प्रकारच्या संकटांना समोर जातांना मानवाला आपले प्राण गमवावे लागत आहे. कोरोना विषाणुचा प्रभाव संपूर्ण जगावरती इतका पडला की, संपूर्ण मानवी जीवन क्षणार्धात नष्ट झाली. आज संपूर्ण विश्वामध्ये कोरोना या विषाणुने ज्या पध्दतीने मानवी जीवन संपविले त्या प्रकारे दुसऱ्या कोणत्याही रोगाने इतका ऱ्हास मानवी समाजावर झाल्याचे

आढळुन येत नाही. परंतु इतिहासामध्ये फ्ल्यु, प्लेग ाय सारख्या रोगाने मानवी आयुष्य उध्वस्त केले असल्याचे आढळते.

## प्रस्तावना

मानव आणि पर्यावरण यांचा संबंध घनिष्ठ स्वरूपाचा आहे असे म्हणायला काहीच हरकत नाही. पर्यावरणाशिवाय मानवी समाजाची कल्पना करताच येणार नाही. काळी कोणताही असो समस्या हया असणारच मग त्या सामाजिक असो की नैसर्गिक परंतु प्रत्येक काळातील समस्याचे स्वरूप हे वेगवेगळे असेल. जागतिक महामारी आणि मानवी समाज यांचा जेव्हा आपण विवेकनिष्ठ विचार करतो तेव्हा इतिहासाच्या पानावर जेव्हा जेव्हा या मानवी मनावर अरिष्टये आलीत त्या अरिष्टांना या मानवी मनाने तर्कपध्दतीने पार पाडली असल्याचे दिसून येते. संकटांना धैर्याने तोंड देतांना मानवाला आपला जीव गमवावा लागला. विसाव्या शतकामध्ये कोरोना नावाचा व्हायरस संपूर्ण जगामध्ये दहशतीचे वातावरण निर्माण करून लाखो लोकांना मृत्युच्या पिंजऱ्यात उभे करून जगातील काही कुटुंबे उध्वस्त केली. संपूर्ण जगामध्ये आतापर्यंत पूर्णपणे नियंत्रणात न येणारी साथ कोव्हिड—१९ ची साथ बघितली आहे. संपूर्ण मानवी समाज मिनिटा—मिनिटावर, सेंकदा—सेंकदाच्या वेळेमध्ये आपले आयुष्य कोरोना नावाच्या व्हायरसमुळे गमवित होता. चीन देशातील वुहान या शहरातून कोरोना नावाचा व्हायरस देशामध्ये अल्प काळामध्ये प्रसारित होऊन अनेक लोकांना आपले प्राण गमवावे लागले. संपूर्ण मानवी समाजावर जेव्हा जेव्हा अशा प्रकारची काही अरिष्टये आलीत त्याचा इतिहास आपण अल्प स्वरूपात एक नजर बघु. या जगातील महामारीचा इतिहास उलगडतांना असे निदर्शनास येते की, इतिहासामध्ये १०० वर्षानंतर मानवी समाजला संकटातील परिस्थितीला तोंड देतांना आपले जीव गमवावा लागत आहे. मानवी समाजाची मोठया प्रमाणात हानी झालेली होती. ख्रिस्तपूर्व काळामध्ये स्पर्शाचा रोगांमुळे अख्खे देश नेस्ताभूत झाल्याचे पुरावे आढळतात. तिसऱ्या आणि सहाव्या शतकात वेगवेगळया प्रकारच्या प्लेगमुळे लाखो बळी गेले. बहुजनांची आई सावित्रीबाई यांनाही प्लेगमुळे मृत्यु ओढवलरा. ११ व्या शतकात कुष्ठरोगाची युरोपमध्ये साथ होती. आजही जगभरामध्ये आपणाला कुष्ठरोगाचे रूग्ण आढळतात. १३५० साली आलेल्या प्लेगच्या साथीमुळे लंडनमध्ये २० टक्के लोकांना जीव गमवावा लागला होता. १८ व्या शतकाच्या सुरूवातीला सुमारे १५० वर्षामध्ये जगभरात कॉलराची साथ ७ वेळा आली होती. रशिया, स्पेन, आफ्रिका, चीन, जपान आणि इंडोनेशियासह अनेक ठिकाणी लाखो मृत्यु पावलेत. १८९६—९७ च्या आसपास आपणाला भारतामध्ये कॉलराची भयंकर साथ आली. मागील २० वर्षात कांजण्या, रशियन ल्यू, स्पॅनिश ल्यू, रशियन ल्यू अशा अनेक रोगाने एकाच वेळी जगामध्ये कितीतरी लाखो लोकांचे जीव गेलीत. एच.आय.व्ही. एड्स चा सुध्दा एकप्रकारे झपाटयाने प्रसार झाला होता. १९८१ साली जेव्हा या रोगाबद्दल लोक जेव्हा अशक्त आणि आजारी पडत होते, काहीचा जीव जात होता, आतपर्यंत ३५ लाखाहून अधिक लोकांचा यामुळे बळी गेला असल्याचे दिसून येते. सध्या कोरोना या विषाणुमुळे संपूर्ण जग भीतीच्या आणि नैराष्येच्या सावटाखाली आढळून येत आहे. चीनमधून सुरू झालेल्या कोरोनाचा प्रसार आणि त्याचे संपूर्ण जगावर काय परिणाम होत आहेत या विषयाला संशोधकांनी या शोध अध्ययनामध्ये आपले संशोधन विचार स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

## संशोधनाची उद्दिष्टये

१. जागतीक महामारीचा परिचय करणे.

२. जागतीक महामारीचा मानवी समाजावर होत असलेला परिणाम स्पष्ट करणे.

**संशोधन पध्दत**

प्रस्तुत शोध निबंध हे द्वितीय स्रोताच्या आधारे विश्लेषित करण्यात आले आहे.

**गृहित कृत्य**

१. निसर्गामध्ये असंतुलन निर्माण झाल्याने वैश्विक अरिष्टये मानवी समाजाला विनाशाच्या प्रक्रियेमध्ये ओढतात.

२. प्राकृतिक विकासापुढे मानवनिर्मित विकास हा स्थायी स्वरूपाचा आढळून येत नाही.

परिस्थितीय संतुलन आणि विकास प्रक्रिया निसर्गामध्ये असणारे भौतिक घटक हे सजिवांची उत्पत्ती, रचना आणि विकासाला प्रभावित करतात. त्याचप्रमाणे सर्व सजीव मिळून सृष्टीची रचना आणि पर्यावरणास प्रभावित करीत असल्याचे आढळून येते. सजीव आणि वातावरणामध्ये संतुलन जीवंत राहण्याकरिता परिस्थितीकीय संतुलन आवश्यक असते. मानवी सर्वांगीण विकासाकरिता परिस्थितीय संतुलनाची आवश्यकता असते. मानवाने केलेल्या अतिरेकी हस्तक्षेपामुळे परिस्थितीय संतुलन बिघडले व निसर्गामध्ये असंतुलन तयार झाल्याने केव्हातरी अचानकपणे विकोपाचे वलय आढळून येतात. कधी भूकंप, महापूर, महामारी आदि संकटातील परिस्थिती ही मानवाच्या अतिरेकाचा परिणाम आहे. मानवाने स्वत:च्या विकासाकरिता निसर्गाच्या ऱ्हासाचा कधीच विचार केला नाही असे म्हणायला काही हरकत नाही. परिस्थितीय असंतुलनामुळे मानवी समाजामध्ये अनेक प्रकारच्या समस्या व संकटे निर्माण झाली आहेत. औद्योगिकीकरण, मोठी धरणे तसेच जमीन, जंगल आणि जल यांच्या अंतर्कसंगतपणे उपयोग केल्याने परिस्थितीय घटकांची फार मोठया प्रमाणात हानी झाली आहे. जल, वायु आणि ध्वनि प्रदूषणामुळे परिस्थितीय ऱ्हास होत आहे. वातावरणामध्ये कार्बन डायऑक्साईडचे प्रमाण वाढत आहे. सांडपाण्याची व्यवस्था कारखाण्यातील दुषित पाणी, किटकनाशकांचा वाढता उपयोग, नद्यामध्ये प्रेताची राख यामुळे वेगवेगळया प्रकारचे प्रदूषण आढळुन येते. त्यामुळेच या मानवी समाजामध्ये समस्या व विविध रोगांनी अक्राळ रूप धारण केले आहे. जागतीक महामारीच्या काळात या मानवी समाजावर कोणकोणते परिणाम झाले. याविषयी खालीलप्रमाणे विचार करण्यात आले.

**महामारीचा परिणाम :**

**१. कुटुंबव्यवस्थेवर परिणाम** — कोरोना या विषाणुने संपूर्ण विश्वामध्ये दहशतीचे वातावरण निर्माण केले. मानवाला जीवंत राहण्याकरिता आर्थिक क्रियांची आवश्यकता असते. अन्न, वस्त्र, निवारा हया गरजा पूर्ण करण्याकरिता मानवाला दैनंदिन श्रम करावे लागते. तेव्हाच कुटुंब व्यवस्था सुरक्षित चालते. कुटुंबातील काही सदस्य ही अर्थाजन करून कुटुंबाचा आर्थिक गरजांची पूर्ती करण्याचा प्रयत्न करतात. मुलांच्या शिक्षणावरती आई—वडिलांना विशेष लक्ष द्यावे लागते. कोरोना काळामध्ये कारखाने, महाविद्यालये, शाळा विविध

कार्यालये इत्यादी उत्पादनाची साधने ही टाळेबंदीमुळे (लॉकडाऊन) बंद असल्यामुळे अनेक लोकांना आपल्या कुटुंबाच्या गरजाची पूर्ती करण्याकरिता अनेक हालअपेष्टा सहन कराव्या लागल्यायत. त्यामुळे कुटुंबामध्ये कलह, नैराश्य आणि दारिद्रयाचे दिवस याचा अनुभव आला.

**२. विवाहसंस्थेवरती परिणाम —** समाजाचे अस्तित्व जीवंत ठेवण्याकरिता या विवाहसंस्थेची आवश्यकता असलयचे काही समाजशास्त्रज्ञ व मानवशास्त्रज्ञ मान्य करतात. लॉकडाऊनच्या काळामध्ये समाजातील लोकांनी विवाहच्या संदर्भात समाजमान्य मार्गानेच लग्न करण्याचे ठरविल्याने कोरोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीशी त्यांना समायोजन करावे लागले. टाळेबंदीच्या काळामध्ये (लॉकडाऊन) विवाहसंस्थेवर काही निर्बंध लादणयत आले होते. ते म्हणजे वधू—वरांना काही निवडक लोकांनाच लग्नकार्याला उपस्थित राहावे अशा प्रकारचा नियम शासनाने काढला.

**३. सामाजिक, सांस्कृतिक आयुष्यावर दहशतीचे सावट —** आजही कोरोना पूर्णपणे संपुष्टात आला असे चित्र कोणत्याही राष्ट्रामध्ये नाही. जिथे जिथे लोक एकत्र यायचे अशा सार्वजनिक ठिकाणी ६ फलट अंतर ठेवून मास्क, सॅनिटॉयझर इत्यादी साधनांचा वापर करून लोक सामाजिक सांस्कृतिक जीवन जगू लागले. परंतु त्यामध्ये ही दहशतीचे सावट आपणाला दिसून येते पुस्तक प्रकाशन, खेळ, भाषण, नाटक, रेस्टॉरेंट इतयदी ठिकाणी एकत्र येतांना दहशतीचे सावट निर्माण झाले आहे. वर्क फ्रॉम होम या संकल्पनेचा उदय महामारीचय काळामध्येही मानवाला आवश्यक असणाऱ्या काही गोष्टींचा पाठपुरावा करावा लागलेला आहे. शासकीय कार्यालये, खाजगी कार्यालये, कारखाने, महाविद्यालये, शाळा इत्यादी ठिकाणी काही माहितीचा पुरवठा सतत आवश्यक असतो. कोरोनाच्या काळामध्ये ही समाजाच्या हिताकरिता आवश्ययक असणाऱ्या बाबींचा कारभार सुरू ठेवावा लागला हा कारभार, वर्क फ्रॉम होम या संकल्पनेच्या माध्यमातून विविध रिपोर्ट सादर करण्यात आले.

**४. पोलीस यंत्रणेवरती तणाव —** कोरोना काळातील समाजाची स्थिती ही भयंकर होती. मृत्युचे थैमान आणि कोरोनाचा प्रसार फार झपाटयाने होत होता. तरीपण पोलीस दलातील कार्य हे दिवस—रात्र सतत सुरू होते. या पोलीसांच्या कर्तव्य दक्षतेमुळे काही प्रमाणात कोरोनावर नियंत्रण मिळविले असले तरी अनेक पोलीसांना आपला जीव गमवावा लागला. आजही पोलीस यंत्रणेवरती तणावाचे सावट आहे.

**५. औद्योगिकरणावरती परिणाम —** लॉकडाऊनमुळे अनेक प्रकारचे कारखाने बंद ठेवण्यात आल्यामुळे अनेक कुटुंबावरती उपासमारीची पाळी आली. या देशातील अनेक कुटुंब आपले अर्थाजन हे कारखाण्यावर करीत आहेत. टाळेबंदीच्या (लॉकडाऊन) निर्णयामुळे अनेक कारखाण्यातील नोकरांना कपात केले. त्यामुळे जगण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

**६. शैक्षणिक संस्थावरती परिणाम —** कोरोनामुळे संपूर्ण मानवी जीवन विस्कळीत झाल्यामुळे काही शिक्षण संस्थांनी ऑनलाईन शिक्षण सुरू केले. या शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना पाहिजे तेवढया प्रमाणात आंतरक्रिया करता आल्या नाहीत.

**७. ग्रामीण आणि आदिवासी भागात प्रवेशबंदी —** काही गावामध्ये आणि आदिवासी क्षेत्रामध्ये शहरामधून येणाऱ्या व्यक्तीला विलगीकरण करण्यास सांगण्यात आले. कोरोनाचा वाढता प्रभाव रोखण्याकरिता प्रत्येकानीच सहकार्य करावे अशा प्रकारच्या विचारांची गाव सभा गाजल्या, बाहेरून येणाऱ्या व्यक्तीला गावामध्ये एकदम प्रवेश न देता त्यांना ग्रामपंचायत किंवा शाळेमध्ये विलगीकरण करण्यात आले.

**८. स्थलांतरीत श्रमिकांना निम्नवर्गाला, मध्यमवर्गाला रोजगाराचा फटका —** कोरोनामुळे स्थलंतरीत झालेल्या श्रमिकांना तसेच निम्न वर्गातील मजुर, मध्यमवर्गातील श्रमीक हयांना रोजगाराचा फटका बसला असल्याचे दिसून येते. लॉकडाऊनमुळे संपूर्ण मानवी जीवन उध्वस्त झाले असल्याचे आढळते.

**९. अर्थव्यवस्थेवरती परिणाम —** कोरोनामुळे संपूर्ण देशातील अर्थव्यवस्था ही कोलमडून गेली असल्याचे आढळते. आज जी.डी.पी. रेट हा खूप कमी झाला असल्यामुळे आपल्याला आढळून येते. सार्वजनिक कंपन्या हया खाजगीकरण करण्यात येत आहे. भविष्यामध्ये भारतीय समाजावर उपासमारीची व बेरोजगरीचे सावट फार मोठया प्रमाणात असतीलच.

**१०. आरोग्य सुविधामध्ये अपुऱ्या सोयी —** लॉकडाऊनमध्ये ज्या—ज्या मानवावरती कोरोनाचा प्रभाव झाला जे—जे कुटुंब कोरोनाने बाधीत झाले त्या सर्व कुटुंबांना आरोग्याच्या सुविधा मिळाल्या नाहीत. शासकीय दवाखाण्यामध्ये गरीबांना पाहिजे तेवढया सुविधा देण्यात आल्या नाहीत. या उलट खाजगी रूग्णालयामध्ये अक्षरश: आर्थिक लूट केली असल्याचे दिसून आले.

**सारांश —**

जागतिक महामारीच्या काळामध्ये मानवी समाजावरती कोरोनाचा प्रभाव हा भयंकर झाल्याने या संपूर्ण मानवी समाजाचे फार नुकसान झाले आहे. दोन वर्षापासून कुटुंबातील लोक दैनंदिन जीवनाला कंटाळले असले तरी त्यांच्या समोर आजही कोरोनाच्या दहशतीचे सावट आहे. मानवाने केलेल्या दिशाहीन विकास प्रक्रियेमुळे व निसर्गावरती केलेल्या आक्रमणामुळे मानवी समाजाला अनेक संकटांना व जागतिक महामारीला तोंड द्यावे लागले आहे. निसर्गातील बदल हा मानवनिर्मित होऊच शकत नाही म्हणून विकास प्रक्रिया ही निसर्गानुसारच मानवाने रेखांकित केली पाहिजे.

**संदर्भ**


- डॉ. अच्युत गोडबोले, दिपा देशमुख 'कोरोनाचं विश्व : कोरोनाचे मानवी जीवनावर होणारे तत्कालीक दुर्गमी परिणाम', साप्ताहिक साधना — ०९ मे २०२०.
- डॉ. भा. कि. खडसे — २००४, भारतीय समाज आणि सामाजिक समस्या — पेज नं. १६७
- http//m.marathi.thewire.in
- http//www.eskal.com nagpur.in
- http//www.orfonline.org.in